## आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत निवेदन

**नावः** – किरण लक्ष्मण जाधव.

**वयः** – ३७ वर्षे, **व्यवसायः** – व्यापार,

**राहणारः** – उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

---

**प्रश्न क्र.१.** मी आता तुम्हाला सरकार पक्षातर्फे तुमच्या विरोधात आलेला पुरावा सांगणार आहे, त्याबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे तुमच्यावरती बंधनकारक नाही, परंतु तुम्ही दिलेल्या उत्तरांचा तुमच्यावतीने किंवा तुमच्या विरोधात वापर केला जावू शकतो, याची तुम्हाला माहिती आहे काय ?

उत्तर – **होय.**

**प्रश्न क्र.२.** पंच सुभाष गुंडू आजगेकर (सा.क्र.२) याच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याला दि.०४.०६.२०२४ रोजी पोलिस कर्मचारी प्रशांत सुतार याने तुम्ही भैरु कदम याच्या घरी भाडयाने राहून दारु विक्री करत असल्यामुळे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – **हे म्हणणे खोटे आहे.**

**प्रश्न क्र.३.** त्याच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याने पंच म्हणून काम करण्यास तयारी दर्शविल्यानंतर दुसरा पंच घुले, पोलिस अधिकारी सुतार साहेब, म. पो. कळेकर व पाटील आणि हवालदार देसाई सोबत तुमच्या घरी येऊन तुम्हाला त्यांचा परिचय देऊन येण्याचा हेतू सांगितला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – **हे म्हणणे खोटे आहे.**

**प्रश्न क्र.४.** त्याच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला त्यांची अंगझडती घेण्यास सांगितले असता तुम्ही नकार दिल्यावर १८.३० वाजता छापा मारुन तुमच्या घरातून मॅकडॉल, रम, व्हीस्की, इंपेरियर ब्ल्यू व्हीस्की, रॉयल स्टॅग, रॉयल चॅलेंज व्हीस्की व देशी दारु संत्राच्या १८० मिलीच्या बाटल्या, टयूबर बिअरच्या ६५० मिलीच्या बाटल्या असा एकूण ४६,०२४/– रुपयांचा मिळालेला मुद्देमाल जप्त करुन त्यावर कागदी लेबल लावले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – **हे म्हणणे खोटे आहे.**

**प्रश्न क्र.५.** त्याच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालातील प्रत्येक नमुन्यातील एक सिलबंद बाटली रासायनिक तपासणीकामी

वेगळी करुन पंचनामा केला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

**उत्तर –** **हे म्हणणे खोटे आहे.**

**प्रश्न क्र.६.** फिर्यादी अनुराधा देवदास पाटील (सा.क्र.३) हिच्या पुराव्यात असे आले आहे की, पंचाने कथन केलेल्या घटनेप्रमाणे वर्णन करुन पंचनामा केल्यानंतर तुम्हाला न्यायालयात हजर करुन तपासासाठी त्याचा ताबा घेऊन तपासामध्ये तुम्ही स्वतः विक्रीसाठी दारु बाळगली असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे तीने तुमच्या विरोधात तक्रार दिली आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

**उत्तर –** **हे म्हणणे खोटे आहे.**

**प्रश्न क्र.७.** सरकार पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देत आहे ?

**उत्तर –** **खोटी साक्ष देत आहेत.**

**प्रश्न क्र.८.** तुम्हाला शपथेवर निवेदन अथवा कागदोपत्री पुरावा द्यायचा आहे काय ?

**उत्तर –** **नाही.**

**प्रश्न क्र.९.** तुम्हाला तुमच्या बचावासाठी स्वतःला अथवा स्वतंत्र साक्षीदाराला तपासायचे आहे काय ?

**उत्तर –** **नाही.**

**प्रश्न क्र.१०.** तुम्हाला सदर खटल्याबाबत आणखीन काही सांगायचे आहे काय ?

**उत्तर –** **नाही.**

------------

आरोपीची सही/अंगठा.

**समक्ष**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०३.२०२६.
( आर. पी. थोरे )

आजरा.
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, आरोपीचा जबाब हा त्याने सांगितल्या प्रमाणे पूर्णतः सत्यतेने माझे समक्ष नोंदविण्यात आलेला आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०३.२०२६.
( आर. पी. थोरे )

आजरा.
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.